**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे-१६**

( यापुढील पत्रव्यवहारासाठी खालील क्रमांक व दिनांक याचा उल्लेख करावा. )
( जागेच्या व इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

**बांधकाम चालू करण्याकरिता दाखला**
**सुधारीत ( कमेन्समेंट सर्टिफिकेट )**

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४/४५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४, व महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ यातील तरतूदींप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

जा.क्र. झोपुप्रा/उप अभि/प्र.क्र.८६/११२७/२०१६
दिनांक- १५/०७/२०१६.

(प्रथम संमतीपत्र जा.क्र. २१० दि. ०३/०२/२०१४
दुरुस्त संमतीपत्र जा.क्र. ६८६/१४ दि. २४/०४/२०१४
दुरुस्त संमतीपत्र जा.क्र. १३६/१५ दि. २९/०१/२०१५
दुरुस्त संमतीपत्र जा.क्र. ७८१/१५ दि. २१/०५/२०१५
दुरुस्त संमतीपत्र जा.क्र. ४७/२०१६ दि. ०७/०१/२०१६)

प्रति,

**मे. अनंत असोसिएट्स,**
**१४ श्री प्रसाद सोसायटी,**
**पर्वती दर्शन, पुणे-४११ ००९.**

द्वारे

आर्किटेक्ट- **आर्कि. कंबाईन,**
**४, सिताराम मेन्शन,**
**३२६, शनिवार पेठ, पुणे-३०.**

यांस -

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४ / ४५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४ व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ पुणे महानगरपालिका समितील **पुणे पेठ पर्वती, टी.पी.स्कीम नं. ३, फा प्लॉट क्र. ५७९, स.नं. १२९ पैकी, दत्तवाडी** येथील **सुधारीत बांधकाम नकाशे** मान्य करण्यासाठी झो.पु.प्रा. ला तुम्ही दि. १२/०५/२०१६ रोजीच्या पत्राने विनंती केली. आहे. त्यावरुन उक्त अधिनियम व प्रस्तावित नियमावलीतील अटींवर तुम्हांस हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

**कनिष्ठ अभियंता**
**झो.पु.प्रा. पुणे.**

**उप अभियंता (वर्ग १)**
**झो.पु.प्रा. पुणे.**

**प्र. सहाय्यक संचालक नगररचना,**
**झो.पु.प्रा. पुणे.**

O/C १/c

## अटी

१. सदरचे संमतीपत्रानंतर यापूर्वी संबंधित प्रस्तावासाठी दिलेली सर्व संमतीपत्रे रद्द समजावीत. तथापि त्यामधील अटी / शर्ती लागू राहतील.

२. सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र सरकारने दि. ५/१/१९८७ या दिवशी मान्य केला आहे. तसेच प्रारुप आराखडा मान्यतेस्तव शासनास सादर झालेला आहे. त्यास अनुसरुन नवीन कामास काही उपसर्ग पोहोचत असल्यास अथवा हानी होत असल्यास त्या प्रित्यर्थ कोणत्याही प्रकारची भरपाई मागता येणार नाही. व ती देण्याची जबाबदारी झो.पु.प्रा. वर नाही.

३. सदर भूखंडातील नियोजित बांधकामामुळे काही झाडे काढणे आवश्यक झाल्यास त्याबाबत पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४. ज्या प्लॉट्सवर नवीन इमारत बांधण्यात येणार आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी प्रत्येक विकसकाने इमारतीसमोर कंपाऊंड वॉलच्या आत वृक्ष संवर्धन कायदा १९७५ च्या तरतूदींनुसार झाडे लावून ती व्यवस्थीत वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. रस्त्यावरील झाडांना जरुर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे.

५. मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास विकसक जबाबदार राहील.

६. कामगारांच्या सोयीसाठी जागेवर किमान पुरेशा संडास / मुता-या तात्पुरत्या स्वरुपाच्या बांधल्या पाहिजेत. जुने संडास व मोरी असल्यास या प्रमाणे संडास, मुतारी बांधण्याची गरज नाही.

७. सदर प्रकरणी मान्य ले-आऊट नकाशा वरील अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

८. Slum Act १९७१ व झो.पु.प्रा.ची नियमावली, शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचे मान्यतेने अटी घालण्याचे अधिकार झो.पु.प्रा. कार्यालयास राहतील.

९. इको हौसिंग बाबत सर्व अटी बंधनकारक राहतील.

१०. या बांधकामासाठी Rain Water Harvesting करुन पावसाचे पाणी साठविणे व ते पुनर्वापर करणे बंधनकारक राहील. तसेच Sewage Treatment Plant व Transformer या सुविधा योग्य त्या प्राधिकरणाच्या निकषानुसार प्रस्तावित करणे बंधनकारक राहील.

११. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रक व अटी विकसकावर बंधनकारक राहतील.

**प्रकल्पांची गुणवत्ता तपासणी**

प्रकल्पाची स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी बांधकामात वापरण्यात येणा-या मालाची गुणवत्ता तसेच बांधकामाचा दर्जा याबाबतची सर्व जबाबदारी विकसकाची राहील.